संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# राज्यपालांचे नारायण नारायण

राजकारणात सत्ता महत्त्वाची नीतिमत्ता नाही. आपल्या देशात राजकारणात थोडी जरी नीतिमत्ता पाळली गेली तरी आपला देश महासत्ता व्हायला वेळ लागणार नाही. दुर्दैवाने आपल्या देशातील राजकारण्यांना देश महासत्ता होण्यापेक्षाही आपल्या स्वत:च्या खुर्चीची सत्ता टिकवणे जास्त महत्त्वाचे वाटते. अगदी साध्या सरपंचापासून ते पंतप्रधान व राज्यपालांपर्यंत प्रत्येकजण खुर्चीला चिकटून राहण्यातच धन्यता मानतो. निदान एका विशिष्ट परिस्थितीत तरी या लोकांनी नैतिक जबाबदारीचे भान ठेवायला हवे. ज्यावेळी आपला कार्यकाल संपत असेल, आपल्या जबाबदाऱ्या वयोमानानुसार नीट पार पाडण्यात कसूर होत असेल, कर्तव्यपूर्ती योग्य पध्दतीने होत नसेल तर एक नैतिक जबाबदारी स्वीकारून पदत्याग करण्याचा मोठेपणा कोणीही दाखवत नाही. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांची शेवटची दोन तीन वर्षे त्यांच्याकडून कर्तव्यात कसूर होत आहे असे दाखवणारी होती. परंतु त्यांनी खुर्ची सोडली नाहीत. आतादेखील देशभरातील अनेक राज्यपाल सरकार बदलल्यानंतर आपली सत्तेची खुर्ची सोडायला तयार नाही गेल्या काही दिवसांपासून नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यानंतर काँग्रेस नेत्यांकडे असलेली राज्यपाल पदे त्यांनी सोडावीत की सोडू नये, अशी चर्चा सुरू आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल शंकर नारायणन यांनी केलेले ताजे विधान जर वाचले तर इतक्या वर्षांनंतरही सत्ता उपभोगण्याची त्यांची हाव सुटलेली नाही हे सिध्द होते. राष्ट्रपतींनी आदेश दिला तरच आपण राजीनामा देऊ, असे सांगून त्यांनी आपला सत्तापिपासूपणाच दाखवून दिला. याचा अर्थ सत्ताधारी पक्षाने राष्ट्रपतींना तसा आदेश देण्याची शिफारस करायला हवी याची ते वाट पहात असावेत. आणि तसा आदेश काढण्यामध्ये सत्ताधारी पक्षाला फारसा वेळ लागणार नाही. मात्र या आदेशाचे कारण पुढे करीत शंकर नारायणन हे जर या पदाला चिकटून रहात असतील तर त्यात त्यांनी त्या पदाची आणि स्वत:ची प्रतिष्ठा ठेवलेली नाही हे सिध्द होते. त्यांच्या या वृत्तीबाबत 'नारायण नारायण' असे म्हणण्याशिवाय दुसरा पर्याय राहात नाही. आपले वयोमान, राजकारणातले आतापर्यंत टिकवलेले स्थान आणि एकूण घटनेने बहाल केलेला राज्यपाल पदाचा मान या काही गोष्टींचा तरी त्यांनी विचार करायला हवा. राज्यपालपद ही निव्वळ राजकीय सोय आहे. त्यासंदर्भात अनाठायी घटनात्मक किंवा कायदेशीर मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्नच खरेतर हास्यास्पद ठरतो. इथे केवळ नैतिकता हीच महत्त्वाची ठरते.

## ना वयाचे भान ना पदाचा सन्मान

राज्यपालांची नियुक्ती राष्ट्रपती करतात. त्यांचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. या सगळ्या घटनात्मक तरतुदी कितीही योग्य असल्या तरी राज्यपालपदी कोणाला नेमायचे याची शिफारस सत्ताधारी पक्ष राष्ट्रपतींना करतो किंवा एखाद्या राज्यपालाला घरी बोलवण्याचे कामही सत्ताधारी पक्षाकडूनच होत असते. खरे सांगायचे तर राज्यपालपद हे केवळ सत्ताधारी पक्षाच्या राजकीय सोयीचे साधन आहे. पक्षातल्या ज्येष्ठ नेत्यांची वृध्दापकाळातली सोय म्हणून या पदाकडे पाहिले जाते. देशभरात कुठेही राज्यपाल पदावर एखाद्या तरुण व्यक्तीची वर्णी लावली जात नाही. सगळे जण साठ सत्तरीच्या पुढचे असतात. घटनात्मक तरतुदींचा हा सरळसरळ मानभंग ठरतो. राज्यपालांना कोणतेही विशेष अधिकार नाहीत. सत्ताधारी पक्षाच्या तालावर नाचण्याचे काम राज्यपाल करीत राहतात. मुख्यमंत्री किंवा मंत्री किंवा न्यायाधीशांना शपथ देणे, विद्यापीठांचे कुलपतीपद भूषवणे एवढीच काय ती घटनात्मक कामे राज्यपालांकडे आहेत. ही कामेसुध्दा पाच वर्षांच्या काळात फार तर उद्घाटने दोन चार वेळा करावी लागतात. आणि उरलेले दिवस एकतर वेगवेगळी उद्घाटने करणे, पुस्तक प्रकाशनांच्या कामाला जाणे किंवा पंतप्रधान राष्ट्रपती यांच्या समारंभांमध्ये एका खुर्चीची जागा अडवणे एवढेच काम राज्यपालांसाठी शिल्लक राहते. परंतु असे असूनही राज्यपाल पदावर जो काही खर्च होतो, तो पाहिल्यावर सरकारी खर्चाची ती एक विल्हेवाटच म्हणायला हवी. प्रचंड असे मोठे राजभवन त्यांच्या निवासासाठी असते. नोकर चाकर गाड्या त्यांच्या दिमतीला असतात. केवळ सत्ताधारी पक्षाच्या जीवावर अनेक ज्येष्ठ राजकारण्यांना उरलेले आयुष्य सुखाने घालवण्याची ती एक हडेलहप्पीच म्हणायला हवी. ब्रिटीश काळामध्ये गव्हर्नर नावाचा प्रकार होता. त्यामध्ये थोडाफार बदल करून हे आधुनिक गव्हर्नर सत्तेची मौजमस्ती उपभोगत असतात. त्यांनादेखील आपण सत्ताधारी पक्षाचे निष्ठावंत नेते म्हणूनच आपल्याला ही बक्षिशी मिळाली आहे हे माहीत असते. अशावेळी जर आपला पक्ष आता सत्तेत राहिला नसेल तर स्वत:हून पायउतार व्हावे हे देखील त्यांच्या लक्षात येऊ नये, हे एका अर्थी लोकशाहीचीच चेष्टा ठरते. भारतीय जनता पार्टीला बहुमत मिळते आहे हे पाहिल्यानंतर लगेचच राज्यपालांनी आपापले राजीनामे स्वत:हून देणे अपेक्षित होते. परंतु दोन किंवा तीन राज्यपालांचा अपवाद वगळला तर एकाही ढुढ्ढाचार्याने आपली सत्तेची काठी सोडण्याची तयारी दाखवलेली नाही.

## राज्यपालपद हवेच कशाला?

त्यातल्यात्यात एक समाधानाची बाब अशी की नरेंद्र मोदी यांच्या सरकारने सध्याच्या राज्यपालांच्या राजीनाम्याची मागणी केलेली नाही. याचा अर्थ या काँग्रेसच्या नेत्यांना नरेंद्र मोदी पाच वर्षे राज्यपालपदी ठेवतील असेही समजण्याचे कारण नाही. सरकार येऊन अजून महिना झालेला नाही कदाचित अजून महिना दोन महिना मोदी सरकार वाट पाहील. त्यांनी कोणतीही राजकीय कटुता न आणता स्वत:हून पद सोडावे, असा प्रयत्न केला जाईल. हा समजूतदारपणा काँग्रेसच्या या निष्ठावंत राज्यपालांनी दाखवला नाही तरच मोदी सरकार राष्ट्रपतींकडून उचलबांगडी करेल. या निमित्ताने एकूणच राज्यपाल या पदाचा विचार होण्याची गरज आहे. राज्यपाल हवेतच कशाला असा प्रश्न निर्माण होतो. त्यांच्या वाट्याला असलेली दोन चार कामे ही मुख्य न्यायाधीश आणि अन्य पदाधिकाऱ्यांकडून करवून घेतली जाऊ शकतात. आज देशभरामध्ये असलेली जवळपास छत्तीस राज्यपालपदे म्हणजे दरवर्षी सरकारचा किमान चाळीस हजार कोटींचा चुराडा असतो. बदलत्या परिस्थितीमध्ये या राजकीय सोयीसुविधेला हद्दपार केले पाहिजे. लोकशाहीत शक्य तितकी पदे ही लोकांकडून निवडली जातात. अशावेळी राज्यपालपद तसे निरर्थक ठरते. एकूण राजकारणातील नैतिकता वाढवायची असेल तर ही सत्तेची कुरणे हळूहळू कमी केली पाहिजेत.